# मानवाधिकार आणि जागतिकीकरण

डॉ. ज्योती राणे

प्रा. ललित मोमाया | डॉ. विजय तुंटे



अथर्व पब्लिकेशन्स

Scanned by CamScanner

- मुलभूत हक्कांची आदिवासींच्या विकासातील भूमिका ........................................ २९०
  - प्रा. डी.पी.डी. दुधाने,नाशिक
- नव सामाजिक चळवळी आणि मानवी हक्क ........................................ २९४
  - प्रा.डॉ.लक्षटे रत्नाकर बाबुराव, देगलूर.
- लोकशाही समाज व्यवस्थेत मानवाधिकारांची भुमिका ........................................ २९८
  - सहा प्रा. शशिकांत भालचंद्र पाटील, पारोळा
- भारतीय राज्यघटनेवर मानवी हक्कांच्या तरतुदींचा पडलेला प्रभाव ........................................ ३०२
  - प्रा.डॉ. विजय साहेबराव तुंटे, अमळनेर.
  - प्रा.सोनवणे रघुनाथ कौतिक, धुळे
- भारतीय संविधानातील मानवी हक्कांच्या तरतुदी आणि वास्तव ........................................ ३०५
  - प्रा. सुनिल एन. संदानशिव, दहिवेल, ता. साक्री, जि. धुळे
- सेनादल विशेषाधिकार कायदा आणि सुरक्षा दलांकडून होणाऱ्या मानवी हक्काच्या उल्लंघनाचे वास्तव!.. ........................................ ३०९
  - प्रा. डॉ. देवेंद्र विसपुते, धुळे.




Scanned by CamScanner

# नव सामाजिक चळवळी आणि मानवी हक्क

**प्रा.डॉ.लक्षटे रत्नाकर बाबुराव**
विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक,राज्यशास्त्र विभाग, देगलूर महाविद्यालय देगलूर.

सामाजिक चळवळ आणि मानवी हक्क यांचे अतुट नाते आहे. २१ व्या शतकापर्यंत उदयास आलेल्या अनेक सामाजिक चळवळींचे मानवी हक्क हे उद्दिष्ट राहिले आहे. भारताच्या शितयुध्दोत्तर राजकारण, अर्थकारण व समाजकारणाला प्रभावित करणारे सामाजिक चळवळी व मानवी हक्क हे दोन महत्वाचे विषय आहेत. त्यामुळेच प्रस्तुत, लेखात वर्तमान भारतीय व्यवस्था या दोन्ही विषयाने कशी प्रभावीत झाली यांचे विश्लेषणात्मक अध्ययन करण्यात आले.

नव सामाजिक चळवळींनी प्रस्थापित वर्ग व जनसमुहांच्या विरोधात एक आव्हान निर्माण केले. ज्याचा उद्देश व्यवस्थेत आधुनिक सुधारणा करणे किंवा नव परंपराची निर्मिती करुन मानवी हक्काचे संरक्षण करण्याचा असू शकतो. या सर्व नव सामाजिक चळवळीतून विकासवादी किंवा क्रांतिकारी विचारधारांची बांधणी केली जाते. ज्याद्वारे एक प्रभावी संस्कृती व संरचना निर्माण केली जाते. सामाजिक चळवळीत सामुहिक क्रिया प्रणाली आहे. ज्यात अधिक संख्येने व्यक्ति, समूह, वर्ग किंवा नेता इ.च्या रुपाने क्रियाशील असते. या क्रियाशीलतेची संगठनात्मक अभिव्यक्ति होवू शकते. आधुनिकतेने राजकारण आणि अर्थव्यवस्थेत मूलभूत संस्थात्मक बदल केले. ज्यास आपण राज्य आणि भांडवलदार या नावाने ओळखतो. आधुनिक लोकशाही राज्य आणि भांडवलदार दोन्ही सरंजामशाहीच्या स्तरातुन निघालेली राजकीय अथवा आर्थिक संरचना आहेत.

नव सामाजिक चळवळी व मानवी हक्काचे सिध्दांत आधुनिक राज्य, आर्थिक व समाजाच्या सहसंबंधाभोवतीच भरकटत असतात. आधुनिक पाश्चिमात्य जगातील अठराव्या शतकात राज्य व चर्च वेगळे झाले. परिणामत: जगाच्या व्यवहारात धर्माशिवाय राजकीय व आर्थिक संघटनांचे महतव व प्रभाव वाढत गेला. पाश्चिमात्य देशातील प्रतिनिधीक लोकशाही, औद्योगिक भांडवलशाहीच्या विकासासोबतच राजकीय व आर्थिक प्रश्नांवरील सामाजिक चळवळीच्या संख्येत वाढ झाली.

पाश्चिमात्य सामाजिक चळवळीच्या प्रारंभिक युगात प्रमुख मुदयात प्रतिनिधी व जबावदेही शासन, सामाजिक समता, आर्थिक उत्पादन व वितरण, सामाजिक व अर्थिक सुरक्षा ईत्यादींचा समावेश होता. वर्तमानातील नव सामाजिक चळवळींची पार्श्वभूमी म्हणुन प्रारंभीक चळवळीकडे पाहिले जाते. नव सामाजिक चळवळींचे सिध्दांत नव्या बौध्दिक विकासाचे प्रयत्न आहेत. जे अशा प्रकारच्या मानवी हक्काच्या चळवळींच्या सुक्ष्म आणि स्थूल भागावर भर देतात. वर्तमान सामाजिक चळवळीच्या उदयातील आर्थिक संरचना व संस्कृतिच्या भूमिकांचे आकलन करतात. तसेच व्यक्तिगत वर्तनाचे या चळवळीवर पडणाऱ्या प्रभावाचा अभ्यास करतात. जुन्या सामाजिक चळवळीत प्रामुख्याने कामगार वर्गाचा जहाल सुधारणावाद किंवा मुलभूत परिवर्तनावाद व्यक्त होतो. तर नव सामाजिक चळवळीत नव्या प्रकारचा मध्यमवर्गीयांचा जहाल सुधारणावादासह मानवी हक्काचे विविध विषय समाविष्ट आहे. नव सामाजिक चळवळींच्या सिध्दांतानी वर्तमान समाजाच्या सामूहिक क्रियांचे विश्लेषण करताना मार्क्सवादाच्या दोषांना रेखांकित केले. मार्क्सवादी विश्लेषणात आर्थिक घटकांच्या तुलनेत राजकीय व सांस्कृतिक घटकांना शिथिल केले. अशाच प्रकारे औद्योगिक समाजातील प्रमुख आधार म्हणजे कामगार आणि भांडवलदार वर्गाच्याच विश्लेषणावर अधिक भर देण्यात आला. ज्यात जातीय व धार्मीक मतभेदांचे विश्लेषण पुर्णत: दुर्लक्षित करण्यात आले.

नव सामाजिक चळवळी व मानवी हक्कांशी संबंधित सिध्दांताची व्याप्ती अधिक वाढली आहे. या विषयावर आज विपूल प्रमाणात साहित्य उपलब्ध आहे. पाश्चिमात्य देशात अशा प्रकारच्या मानवी हक्कांच्या सामाजीक



Scanned by CamScanner

ळीच्या घटना व संख्या अधिक आहेत. अनेक अभ्यासक व विद्वानांनी त्याचं विभिन्न दृष्टिकोनातुन विवेचन या सर्वांच्या नव सामाजिक चळवळीशी संबंधित सिध्दांतात नव मध्यम वर्गाचे चित्रण झाले. संपूर्ण समाज त नव्याने उदयास येत असलेल्या उत्तर औद्योगिक समाजाचे वर्णन व विश्लेषण या सिध्दांतातून झाले. या सिध्दांतकारांच्या दृष्टिने पुन्हा सामाजिक चळवळीतील संघर्षात वर्ग व कामगार वर्गाला प्राधान्य होते. परंतु नव जिक चळवळीत मानवी हक्कांची भूमिका अग्रगण्य बनली. जी संख्यात्मक व भुणात्मक आहे. आधुनिक जिक संरचनेविषयी हैबरमासे सर्वाधिक विस्ताराने शास्त्रीय पध्दतीचा आधार घेवून सिध्दांत मांडला. राजकीय आर्थिक व्यवस्था ज्याचे संचलन सत्ता आणि पैसा यांच्या साह्याने होते. दोन मानवी हक्क ज्याच्या संचलनात ही मानवी मुल्य, लोकभावना व सामंजस्याचे महत्वपुर्ण स्थान आहे. त्यांच्या मते नव सामाजिक चळवळीचे रक्षात्मक व विकृतीत सुधारणा करने आहे न कि व्यापक क्रांतिकारी बदल पाश्चिमात्य विकसित भांडवली शाहीत कांही प्रमाणात न्यायसंगत व योग्यप्रमाणात समता व संतुलन निर्माण झाले. जर एखादयावेळेस व्यवस्थेमार्फत नववसाहतवादामुळे असंतुलन येते तर त्यात संतुलन व सामंजस्य आणण्यासाठी मानवी हकेकांच्या सामाजिक चळवळींची आवश्यकता असते. नव सामाजिक चवळीत ज्या मुद्यांची चर्चा होते त्याचा संबंध कृतिक पुनरुत्थान, सामाजीकरण आणि सामाजिक एकीकरणासोबत अधिक असतो. या चळवळीचा प्रमुख श एका नव्या व पर्यायी राजकारणाचा उदय करणे असतो. ज्यात प्रामुख्याने जीवनस्तर सुधारणे, राजकीय भाग आणि अस्मिततेचा शोध यांचा समावेश असतो. परंतु या नव सामाजिक चळवळीत प्राधान्याने प्रचलित र्थिक विकास व नमुन्यात बदल किंवा पर्याय शोधणे, जागतिक शांतता व पर्यावरण संरक्षणाचे प्रयत्न करणे यांचाच मावेश आढळतो. कारण ते पारंपारिक आर्थिक पुनर्वितरणाच्या संघर्षापासून वेगळया उद्देशाचे प्रयत्न आहेत.

भारतात निर्माण होणाऱ्या मानवी हक्कांच्या नव सामाजिक चळवळीविषयी अनेक प्रश्न निर्माण होतात. यापैकी एक म्हणजे मानवी हक्कांच्या नव सामाजिक चळवळीशी संबंधित सर्व सिध्दांत भारतास लागू होतात का ? भारतात प्रासंगिक आहेत का ? कारण ज्या ऐतिहासिक व सामाजिक – आर्थिक परिस्थितीने पाश्चात्य विकसित भांडवली लोकशाहीने या चळवळीना जन्म दिला ते त्याच स्वरुपात भारतात निर्माण होवू शकत नाहीत. कारण भारतातील समाज उत्तर – पारंपारिक व संक्रमण कालातून जाणार आहे. कारण ज्यातील विभिन्न सामाजिक व भौगोलिक भाग एकाच वेळी वेगवेगळ्या आधुनिकतेच्या संक्रमणातून जात आहेत. महात्मा गांधीच्या व्यक्तिमत्वात एकाच वेळी परंपरा, आधुनिकता व उत्तर आधुनिकतेचे तत्व मिळतात. वर्तमानातील कोणताही देश आधुनिकता किंवा उत्तर आधुनिकतेच्या प्रभावापासुन दूर राहु शकत नाही. त्यातल्या त्यात वर्तमानातील जागतिकीकरणाच्या युगात हे शक्य नाही. विशाल महानगरात आणि जगव्यापी इंटरनेटमुळे आधुनिकता व उत्तर आधुनिकतेचा प्रभाव प्रकर्षाने जाणवतो. भारतातील नव सामाजिक चळवळीचे विश्लेषण करताना म्हणता येईल की, या देशातील मानवी हक्कांच्या नव सामाजिक चळवळींचा विस्तार राजकीय – आर्थिक व विचारधारांच्या संकटामुळे झाला.

या सर्व नव सामाजिक चळवळींच्या विरोधात राष्ट्रीय संप्रदायवादी आणि पारंपारिक, कट्टरपंथीय शक्तींचा उदय होत आहे. तर दुसरीकडे मानवी हक्क, पर्यावरण, सामाजिक, लैंगिक त्या शिवाय इतर अनेक मुद्दे आहेत जे उपेक्षित आहेत. ज्यांना नव सामाजिक चळवळी लक्ष करत आहेत. परंतु या चळवळीचा प्रतिकात्मक प्रभाव वर्तमानात कमकुवत आहे.

भारतातील मानवी हक्कांच्या लोकचळवळी विषयी चिंतन करताना अनेकांनी गांधीवादी परिप्रेक्ष्यात बिगर पक्षीय राजकीय प्रक्रियेच्या संकल्पनेचे स्पष्टीकरण केले. या नव गांधीवादी विचाराच्या उदय सामाजिक परिवर्तनाच्या क्षेत्रात राज्याच्या भुमिकेतील बदल आणि राजकीय प्रक्रियेतील वाढता भ्रष्टाचार व गुन्हेगारीकरणाच्या संदर्भात झाला. यामुळे लोकसंख्येतील एक फार मोठा भाग शोषण, राजकीय दुर्लक्ष आणि जीवन जगण्याच्या प्रक्रियेचा बळी बनला आहे. या संदर्भाने बिगर पारंपारिक समाजवाद्यांनी [illegible] अनेक नवीन कायद्यांचे आयोजन केले. या परिप्रेक्षाकडे पाहता

बिगर पक्षीय न्यायासंबंधात वैकल्पिक, आधारीय व प्रतिपक्षीय विचाराच्या राजकारणाचा प्रारंभ

Scanned by CamScanner

झाल्याचे म्हटले, याचे अधिक स्पष्टीकरण करताना रजनी कोठारीनी कांही उदाहरण दिले. उदा. उत्तराखंडमधील पहाडी भागातील चिपको चळवळ, छत्तीसगढमधील खाणीतील कामगारांचा संघर्ष, आंधप्रदेशातील रैयत कुलि संहत, कर्नाटकातील कनकपुरमधील ग्रेनाईटचे खोदकाम व निर्यात विरोधात शेतकऱ्याचा सत्याग्रह आणि झारखंड मुक्ति मोर्चा इत्यादी कोठारींच्या मते या मूलभूत चळवळीतील संघर्ष फक्त आर्थिक व राजकीय मागण्या पुरताच मर्यादित नाही, तर त्यांचा संबंध पर्यावरण, संस्कृति व शिक्षणाशी आहे. अत्याचार, शोषणा सोबतच आर्थिक व सांस्कृतिक विनाश उदा. दारु, अस्वच्छता, पर्यावरणाचा विनाश इ. प्रश्न व चिंतनात अभिव्यक्त केले.

भारतातील मानवी हक्कांच्या नव सामाजिक चळवळीस काही अभ्यासकांनी लहान – चळवळ असे संबोधले, तसेच त्यास नवे राजकारण किंवा पर्यायी राजकारणाच्या संदर्भाने स्पष्ट केले. त्यांनी भारतातील नव चळवळीचे विश्लेषण करताना स्पष्ट केले की, या चळवळी जनतेकडून बाजाराभिमूख लोकशाही आणि भारतीय राज्यव्यवस्थेकडून आपले संरक्षण करण्याचा प्रयत्न आहे. भारतीय राज्य व्यवस्था जागतिक आर्थिक आणि राजकीय सत्तेची स्थापना करणाऱ्या श्रृखंलाचा एक भाग बनला आहे. राजकीय व सामाजिक चळवळीचा उद्देश आहे. की ते राज्याच्या जागतिकीकरणाच्या धोरणाच्या विरोधात स्थानिय, प्रांतीक व राष्ट्रीय स्तरावर आघाडी व समूह निर्माण करत आहेत. १९७० च्या उत्तरार्धात एक व्यापक चळवळ भारतात उदयास आली. ज्याचा प्रमुख उद्देश इंदिरा गांधीच्या कॉंग्रेस प्रणीत शासनातील भ्रष्टाचार व बिगर लोकशाही प्रवृतींना विरोध करुन सत्तेपासून दूर ठेवणे. ज्यांचा प्रारंभ गुजरात आणि बिहारमध्ये झाला. त्याच गुजरातमधील नरेंद्र मोदीच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेसमुक्त भारताची चळवळ उदयास आली. तदनंतर संपूर्ण उत्तर भारतात त्याचा प्रभाव वाढत गेला. या चळवळीचे नेतृत्व बिगर कॉंग्रेसी जयप्रकाश नारायण यांनी केली. अंतर्गत आणिबाणीच्या घोषणेने या चळवळीला नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला. ज्याचे रुपांतरण १९७७ च्या लोकसभा निवडणूकीत कॉंग्रेसचा दारुण पराभवात झाले. या चळवळीत एका बाजूने जयप्रकाश नारायण व दुसऱ्या बाजुने इंदिरा गांधी परस्पराच्या विरोधात संघर्ष करत होते ते मानवी हक्क व लोकशाहीच्या संघर्षासाठी परिणामत: कांही काळापर्यत भारतीय राज्यव्यवस्थेत अनिश्चिततेचे वातावरण राहिले.

भारतातील आजपर्यंतच्या सर्व सामाजिक चळवळीत वेगळे व भिन्न चळवळ म्हणजे २०११ च्या दरम्यान झालेले भ्रष्टाचारमुक्त भारत चळवळ जिचे नेतृत्व जेष्ठ समाजसेवक व गांधीवादी नेते अण्णा हजारेंने केले. तर याच दरम्यान पश्चिम अशियातील अनेक देशात लोकशाही मार्गाने मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी चळवळी झाल्या ज्यातुन सैनिकी व बिगर सैनिकी शासनाचे पतन झाले. भ्रष्टाचारा विरुध्द भारतातील ही चळवळ व तिचे स्वरुप बिगर राजकीय पक्ष व बिगर संसदीय होते. ज्याचा केंद्रबिंदु भ्रष्टाचाराच्या नियंत्रणासाठी एक लोकपाल विधेयक पास करणे होता. तसेच मानवी हक्कांच्या संरक्षणात भारतात उदयास येणाऱ्या नव वर्गाची ती चाहूल होती. तसेच यासोबतच पक्ष पध्दती, निवडणूक पध्दतीत लोकशाही सुधारणा व राज्यघटनेत मतदानाच्या साह्याने लोकनियुक्त प्रतिनिधींना वापस बोलवण्याचा अधिकार दयावा आणि ग्रामसभांना अधिक व्यापक अधिकार देण्याची मागणी करण्यात आली. या चळवळीने महानगरात शासनविरोधी प्रभावशाली प्रदर्शने झाले. व्यापक स्तरावर सोशल मिडीयाचा वापर करण्यात आला. कदाचित येथूनच सामाजिक चळवळींना डिजिटल चळवळीचे स्वरुप प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले. या काळात अण्णा हजारेनी जवळपास दोन आठवडे दिल्लीच्या रामलीला मैदानवर जे उपोषण केले त्यात लोक सहभाग मोठया प्रमाणात होता. लोकपाल विधेयक संसदेत पास करुन असे आश्वासन मिळाल्यानंतर अण्णा हजारेंनी हे उपोषण सोडले. विधेयकाचे प्रारुप तयार करण्यासाठी एक नवी प्रक्रिया स्विकारण्यात आली. या कार्यासाठी शासनाकडून संयुक्त समिती नियुक्त करण्यात आली ज्याअर्थी नोंद भारत शासनाच्या गॅझेटमध्ये करण्यात आली. ज्यातील अर्धे सदस्य शासनाचे आणि अर्धे नागरी समाजातील असतील. तसेच या समितीचे दोन अध्यक्ष असतील एक प्रणव मुखर्जी जे सध्या भारताचे राष्ट्रपती आहेत. दुसरे अध्यक्ष म्हणजे या चळवळीचे नेते ॲड.शांतिभूषण होते. जेंव्हा असहकार्यामुळे प्रक्रियेत विरोध निर्माण झाला. तेंव्हा दोन्ही पक्षानी लोकपालाबाबतचा वेगवेगळा ड्राफ्ट तयार केला. चळवळीचा वाढता दबाव लक्षात होता. संसदीय समितीकडे हे दोन्ही ड्राफ्ट देण्यात आले. परंतु १५ वी लोकसभा संपेपर्यंत दोन्हीपैकी कोणतेही विधेयक पास करण्यात आले

Scanned by CamScanner